दै. गोदातीर दि. ५.०६.२५

# नांदेडमध्ये फायरिंग: मोक्कातील सराईत गुन्हेगार पोलिसांच्या गोळीबारात जखमी

## पोलीस निरीक्षक चिंचोलकर यांनी चालविली स्वसंरक्षणार्थ गोळी



**नांदेड (प्रतिनिधी)–** मोक्कातील सराईत आरोपी नुकताच जामिनावर सुटल्यानंतर पुन्हा एकदा प्राणघातक हल्ला करून काही दिवसांपासून फरार होता. तो पिस्तूल घेऊन पांगरी शिवारात असल्याची पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना माहिती मिळाली. पोलीस आपल्या मागावर असल्याचे समजताच तो पांगरी कॅनॉल रस्त्याने पळत सुटला. पोलिसांवर जवळच्या पिस्तूलमधून फायर करण्यापूर्वीच पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी स्वतः व कर्मचाऱ्यांच्या संरक्षणार्थ आपल्या सरकारी पिस्तूलमधून गोळी झाडून प्रभाकर हंबर्डे याला जखमी केले.

हंबर्डे याच्या उजव्या पायाला गोळी लागली असून तो जाग्यावरच पडला. त्यानंतर पोलिसांनी त्याला शासकीय रुग्णालय विष्णुपुरी येथे दाखल केले आहे. घटनास्थळाला वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी भेट दिली असून ही गोळीबाराची घटना मंगळवार, दि. ३ जून रोजी रात्री आठच्या सुमारास घडली.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत वेगवेगळे सात गंभीर गुन्हे करून मोक्काअंतर्गत विष्णुपुरी येथील प्रभाकर हंबर्डे (वय २६) हा कारागृहात स्थानबद्ध होता. तो नुकताच जामिनावर बाहेर आला होता. जामिनावर आल्यानंतर त्याने लगेच एकावर प्राणघातक हल्ला केला आणि तेव्हापासून तो फरार होता. नांदेड ग्रामीण पोलीस त्याच्या मागावर होती. सराईत गुन्हेगाराच्या प्रत्येक हालचालीवर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक यांची करडी नजर आहे. प्रभाकर हंबर्डे हा विष्णुपुरी भागात आल्याची माहिती चिंचोलकर यांना मिळाली. त्यांनी अत्यंत गोपनीयता पाळत आपल्या पथकाला सोबत घेत विष्णुपुरी गाठले. तोपर्यंत प्रभाकर हंबर्डे हा पांगरी शिवारात गेल्याचे समजले. पोलिसांनी त्याचा पाठलाग केला. पोलीस आपल्याला अटक करणार हे समजताच पांगरी कॅनॉल रोडने तो पळत सुटला. काही अंतरावर गेल्यानंतर जवळच्या पिस्तुलमधून पोलिसांवर गोळीबार करण्याच्या तयारीत असतानाच स्वसंरक्षणार्थ शासकीय पिस्तुलमधून चिंचोलकर यांनी प्रभाकर हंबर्डे याच्यावर गोळीबार केला. यात हंबर्डे याच्या उजव्या पायाला गोळी लागून आरपार बाहेर गेली आणि यातच तो खाली कोसळला. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडील पिस्तूल जप्त केले. त्याला लगेच विष्णुपुरी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्याच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती समजताच पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय व त्यांची टीम यांनी घटनास्थळ गाठले. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. आरोपी प्रभाकर हंबर्डे याच्यावर वेगवेगळ्या गंभीर स्वरूपाचे सात गुन्हे दाखल असून मोक्काअंतर्गत नुकताच जामीनावर बाहेर आला होता.

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत कुठल्याही गुन्हेगाराची दादागिरी खपवून घेतल्या जाणार नाही. गुन्हेगाराच्या गोळीला गोळीने उत्तर देण्यात येईल आणि हे प्रत्यक्ष आज पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी करून दाखवले. एका सराईत गुन्हेगाराला त्यांनी आपल्या गोळीने कायमचे अपंग केले आहे. भविष्यात यापुढे गुन्हेगाराने डोके वर काढले आणि शहरातील शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला तर ते कुठल्याही परिस्थितीत खपवून घेतल्या जाणार नाही, असा इशाराही ओमकांत चिंचोलकर यांनी गुन्हेगारांना दिला आहे.